महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३६३ वा | दिनांक : १७/१२/२०२५ | वार : बुधवार

## मुंबई महापालिकेसाठी शिवसेना शिंदे गटाचा १२५ जागांचा आग्रह



**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजताच महायुतीमध्ये जागावाटपावरून रस्सीखेच सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मुंबईत १२५ जागा लढवण्याचा आग्रह धरला असतानाच, भाजपने त्यांना केवळ ५२ जागांचा प्रस्ताव दिल्याची विश्वसनीय माहिती समोर आली आहे. भाजपने थेट ५२ जागांची यादीच शिंदेसेनेकडे सोपवल्याने जागावाटपाच्या चर्चेत सुरुवातीलाच तणाव निर्माण झाल्याचे चित्र आहे.

२०१७ मध्ये एकसंध शिवसेनेने ८४ जागा जिंकल्या होत्या, पुढे ही संख्या ९९ वर पोहोचली. पक्षात फूट पडल्यानंतर यातील ४७ नगरसेवकांनी शिंदे गटाची वाट धरली. तसेच २००७ आणि २०१२ मधील माजी नगरसेवकांचा विचार करता आपल्याकडे १०० हून अधिक माजी नगरसेवकांची फौज असल्याचा दावा शिंदे गट करत आहे. याच बळावर त्यांनी १२५ जागांवर दावा केला आहे. मात्र, भाजपने केवळ ५२ जागांचा प्रस्ताव देऊन शिंदेसेनेची कोंडी केली आहे. परवा दोन्ही पक्षात प्रभागनिहाय चर्चा होणार असली, तरी या प्रस्तावामुळे शिंदे गटात अस्वस्थता आहे.

एकीकडे महायुतीत जागावाटपाचा तिढा असतानाच, दुसरीकडे महाविकास आघाडीत मोठी घडामोड होण्याची शक्यता आहे. मुंबईत आजही ताकद असलेल्या उद्धव ठाकरेंना (१० आमदार, ३ खासदार) साथ देण्यासाठी राज ठाकरे यांची मनसे पुढे येण्याची चिन्हे आहेत. दोन्ही पक्षांत वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू असून, जर ही युती आकाराला आली, तर मुंबईत महायुती विरुद्ध ठाकरे बंधू असा अभूतपूर्व सामना रंगणार आहे. तसेच २०१२ आणि २००७ मध्ये विजयी झालेल्या नगरसेवकांचा विचार केल्यास शिंदेसेनेकडे जवळपास १०० माजी नगरसेवकांची फौज आहे. या सगळ्यांना तिकीट मिळवून देण्यासाठी शिंदेसेनेला १२५ जागा हव्या आहेत. पण भाजपने थेट ५२ जागांची यादी देत शिंदेसेनेची कोंडी केली आहे.

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजताच महायुतीमध्ये जागावाटपाच्या हालचालींना वेग आला आहे. आज मुंबईत पार पडलेल्या महायुतीच्या नेत्यांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत जागावाटपाचा प्राथमिक तिढा सुटल्याचे चित्र आहे. या बैठकीत "ज्या ठिकाणी पक्षाचा विद्यमान नगरसेवक, ती जागा त्या पक्षाला," या फॉर्म्युल्यावर दोन्ही पक्षांच्या नेत्यांचे एकमत झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. तर काही जागांची अदलाबदल होणार असल्याची माहिती मिळत आहे.

## MIM चा उद्धव ठाकरेंपुढे मैत्रीचा हात



**छत्रपती संभाजीनगर :** सत्ताधारी महायुतीला पराभूत करण्यासाठी एमआयएमने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेपुढे मैत्रीचा हात पुढे केला आहे. माजी खासदार इम्तियाज जलील यांनी यासंबंधी ठाकरे गटाला खुली ऑफर दिली आहे. पण ठाकरे गटाने एमआयएम व शिवसेनेची विचारसरणी वेगवेगळी असल्याचे सांगत युती करण्यास ठाम नकार दिला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांची घोषणा केली. त्यानंतर राज्यातील राजकीय हालचालींत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर एमआयएमने पुढे केलेला मैत्रीचा हात ठाकरे गटाने नाकारला आहे. ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे याविषयी बोलताना म्हणाले, एमआयएम व शिवसेनेची विचारसरणी केव्हाच एक होऊ शकत नाही. तो पक्ष जातीयवादी आहे. मुस्लिम मतदारांची मालकी इम्तियाज जलील किंवा त्यांच्या पक्षाकडे नाही. मुस्लिमांची मते महाविकास आघाडी व आमच्या पक्षालाही मिळू शकतात.

केवळ निवडणुका जिंकायच्या म्हणून आम्ही आमचा विचार सोडणार नाही. आम्ही शिंदे गट व भाजपचा पराभूत करण्यास सक्षम आहोत. आम्ही हिंदुत्त्वादी आहोत, याचा अर्थ आम्ही मुस्लिमांचा द्वेष करतो असे नाही. पण एमआयएमच्या ऑफरवर विचार करण्याचा प्रश्नच येत नाही.

उल्लेखनीय बाब म्हणजे इम्तियाज जलील यांनी महाविकास आघाडीतील एका पक्षाने छत्रपती संभाजीनगरसह राज्यातील काही निवडक महापालिकांत एमआयएमला सोबत घेण्याचा प्रस्ताव दिल्याचा दावा केला होता. अंबादास दानवे यांनी त्यांचा हा दावाही फेटाळून लावला. महाविकास आघाडीतील कोणत्याही पक्षाने एमआयएमला सोबत घेण्याचा प्रस्ताव दिला नाही. शिवसेनेने तर मुळीच नाही. इतर कोणत्या पक्षाने एमआयएमशी संपर्क साधला असेल तर मला त्याची माहिती नाही. एमआयएम हा जातीयवादी पक्ष आहे, असे ते एमआयएमचा प्रस्ताव फेटाळून लावत म्हणाले.

दुसरीकडे, अंबादास दानवे यांनी युतीचा प्रस्ताव फेटाळल्यानंतर इम्तियाज जलील यांनीही त्यांच्यावर निशाणा साधला आहे. अंबादास दानवेंनी एमआयएमवर जातीयवादाचे आरोप करताना एकदा स्वतःच्या पक्षाकडे पाहावे. ज्यांनी ६ डिसेंबर रोजी शौर्यदिन साजरा केला, त्यांनी हिंमत असेल तर मुस्लिम भागात जाऊन आम्ही बाबरी पाडली असे सांगावे असे ते म्हणाले.

## माणिकराव कोकाटेंचे मंत्रिपद जाणार? : नाशिक सत्र न्यायालयाचे २ वर्षांच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब

**नाशिक :** जिल्हा सत्र न्यायालयाने आज सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांना सदनिका घोटाळ्यात ठोठावलेली २ वर्षांची शिक्षा कायम ठेवली. लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार २ वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झालेल्या मंत्र्यांचे मंत्रिपद जाते. त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोकाटेंचे मंत्रिपद काढून घेणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना मुख्यमंत्री कोट्यातून मिळालेल्या सदनिकांबाबत बनावट कागदपत्रे सादर करून त्या लाटल्याप्रकरणी नाशिक जिल्हा न्यायालयाने प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास व ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. या निकालानंतर अवघ्या दोन तासांत त्यांना जामीन मंजूर झाल्याने कोकाटे यांचे मंत्रीपद तत्काळ धोक्यात आले नव्हते.

मात्र, आता या प्रकरणात महत्त्वाचा टप्पा समोर आला असून जिल्हा सत्र न्यायालयानेही त्यांच्यावर सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली आहे. त्यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजकीय भवितव्यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिक्षेची पुष्टी झाल्यामुळे नैतिकतेच्या मुद्द्यावरून विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होण्याची शक्यता आहे. तसेच, या निर्णयामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून सरकारची पुढील भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या शासकीय सदनिकांचा गैरवापर करून त्या बनावट दस्तावेजांच्या आधारे बळकावल्याच्या प्रकरणात राज्याचे क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना मोठा न्यायालयीन धक्का बसला आहे. नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने प्रथम वर्ग न्यायालयाने यापूर्वी सुनावलेली प्रत्येकी दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवत कोकाटे बंधूंच्या अपीलला फेटाळले आहे. या निर्णयामुळे माणिकराव कोकाटे यांचे मंत्रीपद पुन्हा एकदा संकटात सापडले असून राज्याच्या राजकारणात या प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या प्रकरणात नाशिक जिल्हा प्रथम वर्ग न्यायालयाने यापूर्वी मंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. मात्र, निकालानंतर अवघ्या दोन तासांत दोघांनाही जामीन मंजूर झाल्याने माणिकराव कोकाटे यांचे मंत्रीपद त्या टप्प्यावर वाचले होते. या जामीन प्रक्रियेवर त्यावेळी विरोधकांकडून मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती. तथापि, आता जिल्हा सत्र न्यायालयाने प्रथम वर्ग न्यायालयाचा निकाल कायम ठेवल्याने कोकाटे यांच्यासमोर पुन्हा एकदा कायदेशीर आणि राजकीय संकट उभं ठाकलं आहे. न्यायालयाने शिक्षा कायम ठेवल्यामुळे त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम असून, मंत्रीपदाबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ डिसेंबर २०२५

# पर्यावरण संवर्धनासाठी योग्य जनजागृतीची गरज! - प्रा. डॉ. बापूसाहेब भोसले



**पाटोदा (प्रतिनीधी) :** पर्यावरण संवर्धनासाठी योग्य जनजागृतीची गरज आहे!असे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालय परभणी येथिल पर्यावरणतज्ञ प्रा.डॉ.बापूसाहेब भोसले यांनी केले.ते पाटोदा येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय व वनस्पतीशात्र विभाग आयोजित "डिजीटल ग्रंथालय व पर्यावरण संवर्धन या विषायावरील एक दिवशीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की आधुनिकीकरणात विकास होत असताना समस्यांना सुरवात झाली आहे.त्यामुळे पर्यावरणाचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.वातावरण बदलामुळे प्रदुषण समस्या निर्माण झाली आहे.येणाऱ्या काळात पर्यावरणाचे संवर्धन करणे ही आपली सामुहिक जबाबदारी आहे.म्हणुन आपण सर्वांनी पर्यावरण संवर्धनासाठी शिक्षण,संशोधन व डिजीटल ग्रंथालयाच्या माध्यमातुन योग्य जनजागृतीची गरज निर्माण झाली आहे.या कार्यशाळेचे उदघाटक म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढीचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.तर व्यासपीठावर समन्वयक प्राचार्य डॉ.सुनिल जाधव,प्रा.सोमनाथ घाडगे,अंर्तगत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक प्रा.श्रीमती कल्पना घारगे,ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे ,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.सतिश जरांगे प्रा.बाळासाहेब जोशी यांची उपस्थिती होती.प्रस्ताविक ग्रंथपाल प्रा.श्रीमती ज्योती रकटे यांनी केले.उदघाटक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी उदघाटनपर भाषणात सांगितले की आज प्रदुषण ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे.यासाठी डिजीटल ग्रंथालयाच्या माध्यमातुन पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठीच या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.तरी युवकांनी भविष्यातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी सज्ज राहावे असे अहवान केले.या प्रसंगी प्रा.विनोद किर्दक व प्रा. डॉ.सुनिल जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी करून दिला.या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांनी केले तर आभार वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा.बाळासाहेब जोशी यांनी केले.या कार्यशाळेस सर्व प्राध्यापक वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# पोलीस प्रशासनाच्या वतीने आयोजित स्पर्धेत ज्ञानेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर पोलीस प्रशासनातर्फे आयोजित नाट्य स्पर्धेत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मूकनाट्य या प्रकारात तृतीय क्रमांक मिळवून शाळेचा आणि परिसराचा गौरव वाढवला आहे. या विद्यार्थ्यांनी 'नायलॉन व चायनीज मांजाचे दुष्परिणाम' या अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक विषयावर नाट्यकरणाचे प्रभावी सादरीकरण केले होते. सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक : या यशस्वी सादरीकरणामध्ये खालील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता : पूर्वि कासोटे, करण निकाळजे, समर्थ बुळे, अथर्व डोंगराज, रोहन पुसे, भावेश कोरडे, धनराज भातेवाले, रिषभ जाधव, रुपम पंडूरे, या संघास शालेय विभागातून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. इतर स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांचा सहभाग : नाट्य स्पर्धेशिवाय विद्यालयातील विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धा, कविता गायन स्पर्धा, आणि चित्रकला स्पर्धा यामध्येही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. अभिनंदन व कौतुक: विद्यालयाच्या या लक्षणीय यशाबद्दल मुख्याध्यापिका डॉ.संध्या मोरे, पर्यवेक्षक श्री संभाजी तांगडे, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या श्रीमती मंगला सुलताने आणि परिश्रम घेणाऱ्या सर्व अध्यापक वृंदांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले आहे. ज्ञानेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे!




# गाव होतं छान

बालपणी देवा माझं, गाव होतं छान
मनामधी त्याच्या नाही, काही अभिमान

भावभक्तीमध्ये त्याचं, ओथंबलं मन
जगण्याचं भान होतं,होतं त्यास ज्ञान
असं माझं गाव जगी, लई त्यास मान
बालपणी देवा माझं, गाव होतं छान

काळ्या भुईच्या पोटी, उगलंय सोनं
मायमाती मध्ये किती, गुंतलाय प्राण
गावासाठी रोज माझ्या, काळजात गाणं
बालपणी देवा माझं, गाव होतं छान

खोटा बडेजाव नाही, माणुसकी धन
मिरगाच्या पावसात, हिरवं हिरवं रान
सूख दु:खामध्ये गाव, उभं एकोप्यान
बालपणी देवा माझं, गाव होतं छान

संध्याकाळी देवळात, भजन कीर्तन
वारकरी मायबाप, भक्तीत तल्लीन
आनंदाने गाव करी, साजरे रे सण
बालपणी देवा माझं, गाव होतं छान

**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

# आमची शाळा

आमची शाळा
खूप खूप छान
गुरूजी शिकवितांना
ठेवतो आम्ही भान

शाळेतून मिळते
मौलीक माहिती नाना
शाळेमुळेच रूजतो
अंगी वक्तशीरपणा

पटांगणी खेळ खेळता
बळ येते अंगात
गुरूजी सोबत राहूनी
शिस्त लागते मनात

सुविचार वाचता
शुद्ध होई मन
आम्हा प्राप्त होई
ज्ञानाचे अमृतकण

शाळेमुळेच साकार होई
सुख समृद्धी नि विकास
खूप खूप शिकण्याचा
धरूया



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ डिसेंबर २०२५

## जबाबदारी, प्रामाणिकपणा, आदर, दया आणि न्याय यासारख्या मूल्यांनी विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडवावे: ब्रिगेडियर पाण्डेय







**नाशिक (प्रतिनिधि):** शहरातील तोफखाना केंद्रातील पीएम श्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे आयोजित केंद्रीय विद्यालय संघटनच्या 63 व्या स्थापना दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून वक्तव्य देताना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आणि तोफखाना केंद्राचे ब्रिगेडियर एन.आर. पाण्डेय यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की शैक्षणिक कामगिरीबरोबरच, एक मजबूत चारित्र्य निर्माण करणे यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवनाचा पाया रचते.आपल्या प्रेरणादायी भाषणात ब्रिगेडियर पाण्डेय म्हणाले, "केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. शिक्षणाचा खरा उद्देश समाजाप्रती जबाबदारी समजून घेणारे नागरिक तयार करणे आहे." त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात जबाबदारी, प्रामाणिकपणा, आदर, दयाळूपणा आणि न्याय यासारख्या मूल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमापूर्वी शाळेतील विद्यार्थ्यांनी एक विशेष परिपाठ सादर केला. विद्यार्थ्यांच्या वृंदाने केंद्रीय विद्यालयाचे गीत गायले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सुरुवातीला प्राचार्य गजराज मीणा यांनी शाळेच्या परिसरातच विकसित केलेले हिरवे रोपटे भेट देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. आपल्या स्वागत भाषणात प्राचार्य मीणा यांनी केंद्रीय विद्यालय संघटनच्या स्थापनेची थोडक्यात ओळख करून दिली आणि पाहुण्यांचे शाळेत स्वागत केले. त्यांनी असेही सांगितले की, हे केंद्रीय विद्यालय देशात सुरू झालेल्या पहिल्या 20 शाळांपैकी एक शाळा आहे. यावेळी तोफखाना केंद्राचे डेप्युटी कमांडंट कर्नल अजय पाल सिंग, कर्नल राजीव सिंग यांची विशेष उपस्थिती होती. शाळेचे निवृत्त शिक्षक आणि माजी विद्यार्थी असलेले प्रतिष्ठित नागरिक देखील यावेळी कार्यक्रमात उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुमधुर स्वागतगीताने झाली. प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी ऑपरेशन सिंदूरचे चित्रण करणारे मनमोहक नृत्य सादर केले. बालवाटिकेच्या छोट्या विद्यार्थ्यांनी भारताची भाषिक विविधता, विविधतेत एकता या थीमवर मनमोहक नृत्य सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. केशव माधवन या विद्यार्थ्याने एक सुंदर देशभक्तीपर गीत सादर केले. माध्यमिक विभागातील मुलींनी मनमोहक योगासनांसह नृत्य सादर केले. शिक्षिका धरित्री निर्भवणे आणि स्वाती सोनुले या शिक्षिकेंसह, अदिती कुमारी आणि सोनू यादव या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेत दीर्घकाळ सेवा देणारे वरिष्ठ शिक्षक प्रल्हाद संगनाळे यांचा प्रमुख पाहुण्यांनी सत्कार केला. ज्येष्ठ शिक्षिका उज्ज्वला चांदोरकर यांनी आभार मानले. सतीश बडगुजर, सुदर्शन गुप्ता, पूजा अग्रवाल, आरीफ बेग, संजीवनी गावित, पूजा यादव, कल्पना शिंदे, सागर काठोळे, महादेव इघारे, अनुश्री, अविष्कार धिवरे, अरविंद लोखंडे आदी सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## सदा सर्वदा हरिनाम चिंतन त्रिकाल श्रेष्ट - हभप अजूर्न महाराज मोटे



**कन्नड (अरुण थोरात)** शफेपूर (पिशोर) येथे सुरु असलेल्या अखंड हरीणाम सप्ताह दि. १५ डिसेंबर रोजी सप्ताहातील दुसरे कीर्तन पुष्पगुच्छ ओवतांना मोटे महाराज म्हणाले कि देव व संत याच्यावर कुणाचीही सत्ता चालली नाही हे दोन्ही औलोकीक तर आहेच मात्र यापेक्षाही महत्वाचे म्हणजे सामान्य माणसाला संसाराचा गाडा हाकताना फक्त आणि फक्त हरीचे नाम घेवूनच संसार करावा असे आव्हान त्यांनी यावेळी केले. पुढे बोलताना मोटे महाराज म्हणाले की हरिनामा इतकी ताकद आहे की तुमचे प्रत्येक संकट तो क्षणार्धात नाहीसे करतो व अखेरच्या क्षणी सुद्धा तुम्हाला नामाशिवाय पैलतीरी जाता येणार नाही. हरीचे नाम का घ्यावे कारण स्पष्ट करताना महाराज म्हणाले की रामनामाने जड दगड सुद्धा पाण्यावर तरंगते तुम्ही आम्ही तर माणसं आहोत मग आपल्याला का तो पैलतीरी नेणार नाही ! अभंगाचे सुंदर विश्लेषण करताना महाराजांनी तीन टप्प्यात तुकाराम महाराजांची अभंग प्रति असलेली शूरता वीरता आणि स्थिरता या तीन टप्प्यात समजावून सांगताना महाराज म्हणाले की तुकाराम महाराज संसार सोडून परमार्थ जोडले गेले तेव्हा त्यांनी मागे फिरून पाहिली नाही ! दुसरे वीरता चे महत्व सांगताना त्यांनी पाहिली सांगितली की परमार्थात लागल्यानंतर मनुष्य देह संसाररूपी मायेत अडकून परत माघारी फिरतो परंतु तुकाराम महाराज शूर वीर आणि भक्तीवर स्थिर राहिले हे साध्य फक्त संतानीच केले आपल्याकडून हे होऊ शकत नाही त्या मुळे आपण कामा मध्ये काम काही म्हणा राम राम यापुढे जाऊन मोटे महाराज म्हणाले की माऊलींनी समाधी घेऊन पृथ्वी भूतावर विजय मिळवला एकनाथ महाराजांनी जलसमाधी घेऊन पाण्यावर विजय मिळवला तर मुक्ताईने तेजावर विजय मिळवला मुंगी उडाली आकाशी जनार्दन स्वामींनी वायूवर विजय मिळवला व जगदगुरु तुकाराम महाराजांनी आकाशावर विजय मिळवला म्हणून आमचे संत औलोकीक... दरम्यान कीर्तनाचे प्रायोजक हभप किसन सयाजी मोकासे हभप सुधाकर किसन मोकाशी व हभप राजू किसन मोकासे यांनी महाराजांना शालव श्रीफळ देऊन स्वागत केले . याप्रसंगी विणेकरी सोपान महाराज मोकासे, हार्मोनियम वादक एकनाथ महाराज शेलार, मृदंगाचार्य महेश महाराज कावले, भानुदास महाराज सुरडकर, राजू महाराज मोकासे, शांताराम महाराज ओपळकर, तुकाराम मोकासे, नंदू महाराज, चंद्रभान महाराज नवले, गोविंद महाराज सुरडकर, गोकुळ महाराज सूरडकर, व मैनाजी मोकासे यांच्यासह पंचक्रोशीतील वासडी रामनगर हस्ता मेहेगाव तपोवन नाचनवेल सारोळा गोरपिंपरी नादरपुर पिंपरखेड चिंचोली नागापूर करंजखेड नेवपूर आधी ठिकाणातील भाविक भक्तांनी या महाकिर्तनाला मोठ्या भक्ती भावाने उपस्थित होते.

## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ डिसेंबर २०२५

# अहो, अखखा महाराष्ट्र तुम्ही लुटला..

आता आता कुठे तर
सामान्य शिक्षणाकडे वळत आहेत
स्कॉलरशिप घेऊन का होईना
उच्च शिक्षण घेण्यासाठी धडपडतो आहे

त्यांना तुमच्यासारखी ना जमीन ना पैसा ना मंत्रीपद
कधी फुटपाथवर तर कधी स्टेशनवर
कधी उपाशी तर कधी तापाशी
तरीही शिक्षणासाठी संघर्ष करत आहोत

तुमच्या एकाच घरात
आमदार,खासदार,मंत्री अजून काही
जे इमाने इतबारे शिकतात अन् शेती पिकवतात
त्यांच्याविषयी तुमच्या मनात बेईमानी !

तुम्ही किती किती घोटाळे करता
या पक्षातुन त्या पक्षात जाता
कधी चोरून पहाटेचा शपथविधी
तुमच्यासारखे ते धोकेबाज तर नाहीत ना ?

तुम्ही जमीन चोरता,बॅक लुटतात
खरे घोटाळेबाज तर तुम्ही
ते नियमात राहुन स्कॉलरशिप घेतात
तरी म्हणे पैशासाठी पीएच्.डी.करतात

अहो, हे तुमचे वागणे
अगदी बेंबीच्या देठापासूनचे
तोंडात फुले,शाहू,आंबेडकरांचे फक्त नाव
मनात मात्र जातीच्या विषाचा खजीना

स्कॉलरशिप घेऊन जे शिकतात
त्यांच्याविषयी तुमच्या मनात एवढा द्वेष
अहो,अखखा महाराष्ट्र तुम्ही लुटला
आम्ही किती संयमी आणि शांत ?



**प्रा. डॉ. सतीश मस्के,**
पिंपळनेर ( धुळे ) मो.९४२३३९७४८४

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# पेन्शनधारक : सन्मानपूर्वक वृद्धत्वाची सामाजिक हमी





दरवर्षी 17 डिसेंबर हा दिवस 'पेन्शनधारक दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस निवृत्त कर्मचाऱ्यांचा केवळ औपचारिक सन्मान करण्यापुरता मर्यादित नसून, राष्ट्रनिर्मितीच्या दीर्घ प्रक्रियेत आयुष्याची सर्वोत्तम वर्षे अर्पण करणाऱ्या व्यक्तींप्रती समाजाने व्यक्त करावयाच्या कृतज्ञतेचा दिवस आहे. प्रशासन, शिक्षण, संरक्षण, पोलीस, आरोग्य, सार्वजनिक उपक्रम, औद्योगिक व तांत्रिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या लाखो कर्मचाऱ्यांनी शिस्त, निष्ठा आणि प्रामाणिकपणाने आपली सेवा बजावली. आज दिसणाऱ्या संस्था, व्यवस्था आणि सार्वजनिक सुविधा या त्यांच्या अथक श्रमांचे फलित आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, पेन्शनधारक हे केवळ निवृत्त कर्मचारी नसून समाजाच्या सातत्याचे, अनुभवाचे आणि मूल्यव्यवस्थेचे जिवंत प्रतिनिधी आहेत.पेन्शन ही संकल्पना केवळ निवृत्तीनंतर मिळणाऱ्या आर्थिक रकमेपुरती मर्यादित नाही तर ती सामाजिक सुरक्षिततेचा मूलभूत आधार आहे. आधुनिक कल्याणकारी राज्यव्यवस्थेत पेन्शन म्हणजे व्यक्ती आणि राज्य यांच्यातील सामाजिक करार होय. व्यक्ती आपल्या कार्यकाळात श्रम, कौशल्य, वेळ आणि निष्ठा समाजासाठी देते; त्याबदल्यात निवृत्तीनंतर तिला सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि स्वावलंबी जीवन देणे ही राज्याची नैतिक व घटनात्मक जबाबदारी ठरते. त्यामुळे पेन्शनधारक दिन हा सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराची आठवण करून देणारा महत्त्वाचा दिवस ठरतो.भारतीय समाजात पारंपरिकरीत्या वृद्धांना मानाचे स्थान होते. संयुक्त कुटुंबपद्धतीत ज्येष्ठ नागरिक हे अनुभवाचे मार्गदर्शक, मूल्यसंस्कारांचे वाहक आणि निर्णयप्रक्रियेतील आधार मानले जात. मात्र औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण, शिक्षण व रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि बदलती जीवनशैली यांमुळे कुटुंबरचना झपाट्याने बदलली. संयुक्त कुटुंबांची जागा लहान व एकल कुटुंबांनी घेतली. या सामाजिक परिवर्तनाचा सर्वाधिक परिणाम वृद्ध आणि निवृत्त व्यक्तींवर झाला. अनेक पेन्शनधारकांना आज एकाकीपणा, भावनिक असुरक्षितता आणि सामाजिक दुर्लक्ष यांचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत पेन्शन ही केवळ आर्थिक आधार न राहता, आत्मसन्मान टिकवून ठेवणारी जीवनरेषा ठरते.वाढती महागाई हा पेन्शनधारकांच्या जीवनातील गंभीर प्रश्न आहे. निश्चित उत्पन्न आणि सातत्याने वाढणारा खर्च यातील दरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. औषधोपचार, वैद्यकीय तपासण्या, रुग्णालयीन सेवा, घरभाडे, वीज-पाणी, वाहतूक आणि दैनंदिन गरजा यांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वृद्धावस्थेत आरोग्यविषयक समस्या वाढतात आणि त्यासाठी अनपेक्षित खर्च करावा लागतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही स्थिती केवळ वैयक्तिक अडचण नसून सामाजिक सुरक्षेच्या अपुऱ्या व्यवस्थेचे द्योतक आहे. त्यामुळे पेन्शन व्यवस्थेत महागाईनुसार सुधारणा आणि आरोग्यसुरक्षेची हमी अधिक बळकट करणे अपरिहार्य ठरते.पेन्शनधारकांना भेडसावणाऱ्या अडचणी आर्थिक मर्यादित नसून प्रशासकीय स्वरूपाच्याही आहेत. पेन्शन मंजुरीतील विलंब, कागदपत्रांची गुंतागुंत, नियमांतील अस्पष्टता, जीवन प्रमाणपत्राची प्रक्रिया, बँकिंग अडचणी आणि तक्रार निवारणातील उदासीनता यांमुळे अनेक निवृत्त कर्मचारी मानसिक तणावात राहतात. डिजिटल युगात अनेक सेवा ऑनलाइन झाल्या असल्या, तरी सर्वच पेन्शनधारक डिजिटलदृष्ट्या साक्षर असतीलच असे नाही. बायोमेट्रिक अडचणी, तांत्रिक बिघाड आणि डिजिटल दरी यामुळे कधी कधी हक्क असूनही सेवा मिळविणे कठीण जाते. म्हणूनच तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी संवेदनशीलता आणि प्रत्यक्ष सहाय्य यांना तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.निवृत्ती म्हणजे सामाजिक आयुष्यातून निवृत्ती नव्हे, हे समाजाने समजून घेणे गरजेचे आहे. अनेक पेन्शनधारक आजही शिक्षण, समाजसेवा, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, पर्यावरण संवर्धन, वाचन चळवळ, समुपदेशन आणि मार्गदर्शन अशा विविध क्षेत्रांत सक्रिय योगदान देत आहेत. त्यांचा अनुभव, शिस्त आणि विवेक समाजासाठी अमूल्य आहे. मात्र योग्य व्यासपीठे आणि संधी उपलब्ध नसल्यामुळे हा अनुभव अनेकदा दुर्लक्षित राहतो. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की 'सक्रिय वृद्धत्व' ही संकल्पना केवळ वृद्धांच्या आरोग्यासाठी नव्हे, तर समाजाच्या सुदृढतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे.कुटुंबव्यवस्थेत पेन्शनधारकांचे स्थान बदलत चालले आहे. आर्थिक स्वावलंबनामुळे काही प्रमाणात स्वातंत्र्य मिळत असले, तरी अनेक वेळा निर्णयप्रक्रियेतून त्यांना दूर ठेवले जाते. बदलत्या मूल्यव्यवस्थेमुळे वृद्धांचे अनुभव 'कालबाह्य' समजले जातात. यामुळे आत्मसन्मानाला धक्का बसतो आणि भावनिक दुरावा वाढतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, पिढ्यांमधील संवाद तुटणे ही समाजासाठी गंभीर समस्या आहे. पेन्शनधारक दिन हा पिढ्यांमधील संवाद, परस्पर आदर आणि सामाजिक सलोखा वाढविण्याची संधी ठरायला हवा.शासनाच्या धोरणांच्या संदर्भात पाहता, पेन्शन व्यवस्था ही केवळ आर्थिक भार म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. ती सामाजिक स्थैर्य, नागरिकांचा राज्यावरील विश्वास आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवणारी व्यवस्था आहे. किमान पेन्शनची हमी, महागाई निर्देशांकानुसार नियमित सुधारणा, सुलभ व पारदर्शक प्रशासकीय प्रक्रिया, सर्वसमावेशक आरोग्य सुविधा, औषधांवरील सवलत आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा अधिक बळकट करण्याची गरज आहे. विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगार, महिला कर्मचारी आणि अल्प उत्पन्न गटातील निवृत्त व्यक्ती यांच्यासाठी सामाजिक सुरक्षा अधिक व्यापक असली पाहिजे. पेन्शनधारक दिन आपल्याला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो. आपण समाज म्हणून आपल्या ज्येष्ठ नागरिकांशी किती संवेदनशील आहोत? त्यांच्या योगदानाची जाणीव आपण केवळ दिनविशेषापुरती ठेवतो की दैनंदिन जीवनातही सन्मान, सहानुभूती आणि जबाबदारी दाखवतो? समाजाची प्रगती ही केवळ तरुण पिढीच्या ऊर्जेवर अवलंबून नसून ज्येष्ठांच्या अनुभवावरही उभी असते. हा समतोल जपणे म्हणजेच सामाजिक प्रगल्भतेची खरी ओळख होय.शेवटी, पेन्शनधारक म्हणजे समाजावर ओझे नसून समाजाची मौल्यवान संपत्ती आहेत. त्यांनी उभारलेल्या संस्था, रुजवलेली मूल्ये आणि निर्माण केलेली व्यवस्था यांवरच आजचा समाज उभा आहे. त्यांचा सन्मान करणे म्हणजे आपल्या भूतकाळाचा सन्मान करणे आणि भविष्यातील स्वतःच्या वृद्धत्वाबद्दल संवेदनशील राहणे होय. 17 डिसेंबरचा पेन्शनधारक दिन हा केवळ एक दिनविशेष न राहता सामाजिक कृतज्ञतेचा, न्यायाचा आणि मानवी मूल्यांचा जागर ठरला, तरच तो खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com